**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – भास्कर श्रीधरराव सुर्यवंशी,
वय -६३ वर्षे, धंदा - सेवानिवृत्त ए.एस.आय.
रा. अंधोरी, ता. अहमदपूर, जि. लातूर

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती काकडे</u>**

**०१.** दि.१४/०८/२०१८ रोजी अहमदपूर पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यतर होतो.मी त्यादिवशी ठाणे अंमलदार म्हणून डॉ. देशमुख यांचे एम.एल.सी. क्रंमाक १३/२०१८ प्राप्त झाले होते. हे एम.एल.सी. प्राप्त झाल्यानंतर हेड कॉन्स्टेबल कारपे हे जखमीचा जवाब घेणे कामी डॉ. देशमुख यांच्या हॉस्पीटलमध्ये गेले. त्यांनी जखमीचा जवाब नोंदविला. त्या जवाबानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांचा गुन्हा क्र. २९४/२०१८ असा भादवीचे कलम ३२६,३२७,३४१ ३२३,५०४,५०६ व सह कलम ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला. त्या गुन्हयाचा तपास माझ्याकडे देण्यात आला. शासकीय पंच मिळावेत म्हणून राज्य परिवहन विभाग, अहमदपूर यांना पत्र दिले. आता मला त्या पत्राची स्थळ प्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पत्राच्या प्रतीला **निशाणी क्र. १०४** देण्यात येते. पत्राप्रमाणे शासकीय पंच हजर झाल्यानंतर मी व पंच घटनास्थळावर गेलो, घटनास्थळ अंबाजोगाई अहमदपूर रोडवर काजळ हिप्परगासमोर रस्त्यावरील वळणावर होते. घटनास्थळावर मोटार सायकलचे फायबरचे तुटलेले तुकडे पडले होते. ते पंचा समक्ष जप्त केले. ते तुकडे पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला वस्तू-अ फायबरचे तुकडे दाखविले ते तुकडे मी जप्त केले होते. आता मला निशाणी क्र. ४८ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी जप्त फायबरचे तुकडे मुद्येमाल पावती तयार करुन मुद्येमाल कारकुनाकडे जमा केले. साक्षीदारांचे तपासटिपणे नोंदविली. जखमीचे वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन दोषारोप पत्रासोबत दाखल केले. मी आरोपींना अटक केली त्याबाबत अटक पंचनामे तयार केले . आता मला अटक पंचनामे दाखविण्यात आले, त्यावर आरोपींची, माझी व पंचाच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. अटक पंचनाम्यांना **निशाणी क्र.१०५ ते १०७** देण्यात येते. आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने दोषारोप पत्र दाखल केले. आरोपीं न्यायालयत हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.व्ही. देशमुख यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, हॉटेल विसावा धाबा येथील कर्मचा-याचे जवाब मी नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या दोन्हीही बाजूला शेती आहे, त्या शेतक-याचे जवाब मी नोंदविले नाहीत. मी आरोपी क्र. २ व ३ नामे विकास व राहुल काय व्यवसाय करतात याची चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ घटनेच्या दिवशी एम. पी.एस.सी.च्या क्लासमध्ये पुण्यात होता, त्याबाबतचे सी.सी.टि.व्ही. फुटेज

आरोपीने मला दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या काळात अहमदपूर- अंबाजोगाई रोडवर खड्डे पडलेले होते. फिर्यादीने आरोपीं विरुद्ध् पुर्वीही पोलीसात तक्रार दिल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी घटनेच्या पुर्वी एम.एस.ई.बी. कार्यालय, तहसिल कार्यालय, अहमदपूर येथे गेला होता याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ९६ वरील वैदकीय प्रमाणपत्रात पोलीस ठाण्यात प्राप्त झालेल्या एम.एल.सी. क्रमांकाचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनमा तयार करुन खोटे दोषरोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**

दिनांक -०६.०१.२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.